# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

(निविदा सुचना)

जा.क्र.नांवाशमनपा/पापूवजनि/४४७९/२०२५, दिनांक :- ३०.०६.२०२५

खालील कामासाठी ड नमुण्यात मोहोरबंद दरपत्रक,आयुक्त नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका,नांदेड हे महाराष्ट्र शासनाकडील उद्योजक नोंदणी प्रमाणपत्र धारक/ मुंबई दुकाने संस्था नोंदणी प्रमाणपत्र / सेवाभावी संस्था यांच्याकडून दरपत्रक मागवित आहोत. दरपत्रक सुचनेतील नियम व अटी केवळ कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात व मनपा नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| निविदा विक्रीचा दिनांक व वेळ | ०१.०७.२०२५ | ते | ०८.०७.२०२५ | वेळ (११.०० ते ०५.००) |
| निविदा दाखल करणे दिनांक व वैळ | ०१.०७.२०२५ | ते | ०८.०७.२०२५ | वेळ (११.३० ते ०५.३०) |

| अ.क्र. | कामाचे नांव | पुरवठ्याचे प्रमाण | इसारा रक्कम १% | कोऱ्या निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांवाशमनपाकेच्या पंपींग स्टेशन व जलशुध्दीकरण केंद्र येथे फ्लो मिटर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे बाबत. | आवश्यकतेनुसार | १०००/- | २६०/- | २४ महिणे |

स्वाक्षरीत/-
अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**प्रतिलिपी:-**

१) नोटीस बोर्ड,मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

२) संगणक व्यवस्थापक,संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की नांदेड मनपा वेबसाईटवर सदर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात यावी.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
करीता/-

## निविदा अटी व नियम

कंत्राटदाराने कोरी निविदा प्रपत्रे विकत घेण्याकरीता करावयाच्या अर्जासोबत खालील बाबी तांत्रीक लिफाफा मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र शासनाकडील उद्योजक नोंदणी प्रमाणपत्र धारक/ मुंबई दुकाने संस्था नोंदणी प्रमाणपत्र / सेवाभावी संस्था यांचे नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

२. Water Flow Meter देखभाल दुरुस्ती करणे बाबतचे अनुभव प्रमाणपत्र (मनपा/नपा/जिल्हा परिषद/MIDC इत्यादी)

३. निविदा शुल्क (Tender Fee) भरणा केल्याची पावती व इसारा रक्कम EMD ची रक्कम Online Gateway Payment /बँकेचा FDR, CDR व्दारे भरणा केल्याचा पुरावा.

४. पॅन कार्ड.

५. जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र.

६. शासकीय कायदान्वये EPF व ESIC नोंदणी प्रमाणपत्र किंवा सुट असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. कंत्राटदाराने मागील तीन वर्षाचा आयकर (२०२२ ते २०२५ पर्यंत) चा भरणा केल्याचे प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०(फ) नुसार महापालिका पदधिका-यांचे निविदा संदर्भात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रमाण पत्र निविदाधारकांना लेटर हॅडवर सादर करणे आवश्यक आहे.

९. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र./इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये कंत्राटदाराने सर्व कागदपत्रे खरी असल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र १००/- स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र कामाचे नांव टाकून जोडणे बंधनकारक आहे.

१०. निविदा धाराकाला काळया यादीत टाकले नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र.

## इतर अटी व शर्ती

१ अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सां.बां.विभागाचा शासन निर्णय क्र.सी.ऐ.टी २०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२७.०९.२०१८ मधील शुध्दीपत्रक दि.२८ नोव्हेंबर २०१८ नुसार लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.०२ उघडल्यानंतर प्रथम न्युनदेकार सादर करणा-या L१ निविदा धारकाराने "Additional Performance Security" दिवसाच्या आत संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करावे.

२ Defect Liability Period हा महाराष्ट्र शासण सा. बां.वि.शासण निर्णय क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दि.१४.०१.२०१९ अन्वये राहील.

३ कंत्राटदारांने कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर शासकीय विमा कंपनीकडून विमा पॉलीसी काढणे अनिवार्य आहे.

४ पहिल्या लिफाप्यात कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्याशिवाय दुसरा लिफाफा उघडण्यात येणार नाही व त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५ निविदाची ऑफर निविदाधारकास ९० दिवस बंधनकारक राहील.

६ प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा समितीसमोर उघडण्यात येतील.सदरील बाबतील पुर्वसुचना संबधित निविदाधारकास देण्यात येइल.

७ लिफाफा क्र.१ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करतांना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहतील.मनपाचा कोणताही अधिकारी जबाबदार असणार नाही.

८ सदरील कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासुन निविदेत दर्शविलेल्या कालावधीच्या आत काम पुर्ण करावे लागेल.दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न केल्यास निविदा अटीप्रमाणे दंड लावण्यात येईल. कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

९ कामाचे अंदाजपत्रक, नकाशे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळुन पहावयास मिळतील.

१० इतर नियम व अटी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेडच्या सुचना फलकावर तसेच कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

११ काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यावर कामाचे Geo Tag फोटो काढावे. सदरील फोटो कार्यालयाकडे सादर करणे दबंधनकारक आहे.

१२ एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त,मनपा,नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
करीता/-